# जिल्हा परिषद, सांगली
## आरोग्य विभाग

**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली-मिरज रोड, पुष्कराज चौक, सांगली ता-मिरज जि-सांगली**

फोन नं.- ०२३३-२३७३०३२ Email ID– zpdhosan@yahoo.co.in


---

जा क्र आरोग्य/आस्था-४/ २६५१ /२०२१ दिनांक:-०९ /०९/२०२१

---

**सुधारित जाहिर प्रकटन**

**आरोग्य विभाग जिल्हा परिषद, सांगली**

"मार्च २०१९" च्या जाहिरातीनुसार जिल्हा परिषद सांगली कडून दिव्यांगाच्या नव्याने समाविष्ठ प्रवर्गासाठी व समांतर आरक्षण बदलामुळे नव्याने वाढ झालेल्या प्रवर्गासाठी दिनांक:- २६/०८/२०२१ रोजी जाहिरात दिलेली आहे.

सदरची जाहिरात, जाहिर प्रकटन व शैक्षणिक अर्हता व अटी-शर्ती या जिल्हा परिषद सांगली कडील www.zpsangli.com वर प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदरचे सुधारित जाहिर प्रकटन जिल्हा परिषद सांगलीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेले आहे.

शासनाच्या दिनांक:- ०१ सप्टेंबर २०२१ च्या शुध्दीपत्रकानुसार सुधारित जाहिर प्रकटन खालील प्रमाणे.

**शासन शुध्दीपत्रक:-**

**शासन निर्णय दिनांक:- १४/०६/२०२१ मधील परिच्छेद क्रं. १(६) मध्ये खालीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे:-**

आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक (पुरुष) व आरोग्य सेविका या ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार असल्याने आता उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये परिक्षेकरीता उपस्थित राहता येईल. तसेच, उमेदवाराने एका जिल्हा परिषदेमध्ये एका पेक्षा जास्त पदांसाठी यापुर्वी अर्ज सादर केले असतील तर, संबंधित उमेदवारांस संबंधित जिल्हा परिषदेमधून एकापेक्षा जास्त पदांसाठी परीक्षा देता येईल. या अनुषंगाने परिक्षेस पात्र उमेदवाराने यापुर्वी त्याने सादर केलेल्या अर्जानुसार कोणत्या जिल्हा परिषदेमधून परिक्षेस बसणार आहे. याबाबतचा विकल्प देणे बंधनकारक असेल.

**तसेच,**

**शासन शुध्दीपत्रक दि. २०/०८/२०२१ सोबतच्या विवरणपत्रक - "अ" मधील मुद्दा क्रं. ५ खालील प्रमाणे आहे.**

"माहे मार्च २०२१" च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरीता उमेदवारांना एक किंवा एका पेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापी, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येण्यार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील प्रत्येक संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमधून परिक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरीता अर्ज सादर केले आहेत. अशा उमेदवारांनी परिक्षेकरीता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प वरिलप्रमाणे नमुद संकेतस्थळावर दिनांक:- ०१ सप्टेंबर, २०२१ ते १४ सप्टेंबर, २०२१ या कालावधीपर्यंत नोंदविणे आवश्यक राहिल.

**याऐवजी**

**"माहे मार्च, २०१९" च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोटल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधित पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पदध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गातील परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून परीक्षा देता**

येणार आहे. तथापि ५ संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणाऱ्या परक्षिसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नप्रत्रिका सर्व जिल्हा परिषदासांठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवारांने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधून अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील. अशा उमदेवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदे अंतर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहून परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेमधून सदर पदभरतीसाठी अर्ज भरला आहे. त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरीताच्या तयार होणाऱ्या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नाव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भूत केले जाईल.

तसेच, नव्याने समाविष्ठ झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागांसाठी प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीनुसार परिक्षेला बसू इच्छिणाऱ्या उमेदवाराला विभागाच्या दि. २३/०७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एक किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहिल. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच उमेदवारांने परिक्षेसाठी उपस्थित रहाण्याकरीता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत, www.maharddzp.com या संकेतस्थळानुसार जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारांस प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच, सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरिल परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे राहिल, असे वाचावे.

शासन शुध्दीपत्रक दिनांकः- २०/०८/२०२१ च्या विवरणपत्रक -अ मधील मुद्दा क्रं. ८ रद्द करण्यात येत आहे व विवरणपत्रक- ब मधील क्र २ मधून एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदामध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदावारांकडून जिल्हाचा विकल्प घेणे ही बाब वगळण्यात येत आहे.

सही/-xxx
( डॉ.मिलिंद पोरे )
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

सही/-xxx
( जितेंद्र डूडी )
सदस्य, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली